नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०३/२०२६ (रविवार )

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक कमणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ४ वाहनासह ५७ लाख ४२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर :— सावनेर पोलीसांनी सतर्क पेट्रोलींग करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—यांवर खालील प्रमाण कारवाई केली.

कारवाई क्र. ०१ :— दिनांक १२/०३/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना अंबीका चौकात एक संशयीत १० चक्का टिप्पर क्र. एम एच—२७/डी टी— १९१९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर चा **चालक नामे १) अश्पाक गौरअली पठाण, वय ५९ वर्ष, रा. वार्ड नं. ६, ता. वरूड, जि. अमरावती** मिळुन आला. वाहन चालकाकडे असलेल्या रेती वाहतूकीच्या परवान्यापेक्षा जास्त तसेच क्षमतेपेक्षा जास्त रेती आढळुन आली. **पोलीसांनी पंचासमक्ष** १) १० चक्का टिप्पर क्र. एम एच—२७/डी टी— १९१९ किंमती १३,००,०००/—रूपये पारवान्यापेक्षा जास्त असलेली ०२ ब्रास रेती किंमती १०,०००/—रूपये असा एकुण १३,१०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई क्र. ०२ :— दिनांक १५/०३/२०२६ रोजी सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान मोहपाकडे जाणारा सावनेर बायपास कोलार नदीचे पुलावर १) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच—३४/बि.जी—१००४ २) १० चक्का टिप्पर क्र. एम एच—४०/सि.एम—८५३९ ३) ट्रक क्र. एम एच—४०/सि डी—०५९७ हे तिन वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर क्र. १) चा **चालक नामे सौरभ हरीदास सांगोळे, वय ३० वर्ष, रा. मंगसा ता. सावनेर,**

जि. नागपूर असे सांगितले. टिप्पर क्र. २) चा **चालक नामे निलेश जिवनलाल उईके, वय ३१ वर्ष, रा. वडचिचोली ठाना, ता. जि.पांढुर्णा मध्यप्रदेश ३) ट्रक क्र. ३) चा चालक नामे सचिन विठ्ठल पटले, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. १, किल्लापुरा खापा, ता. सावनेर, जि. नागपूर असे सांगितले.** पोलीसांनी तिन्ही वाहनाची तपासणी केली असता रेती वाहतूकीच्या परवान्यापेक्षा जास्त तसेच क्षमतेपेक्षा जास्त रेती आढळुन आली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन्ही वाहने** १) १२ चक्का टिप्पर क्र. एम एच–३४/बि.जी–१००४ किंमती १८,००,०००/–रूपये २) १० चक्का टिप्पर क्र. एम एच–४०/सि.एम–८५३९ किंमती १३,००,०००/–रूपये ३) ट्रक क्र. एम एच–४०/सि डी–०५९७ किंमती १३,००,०००/–रूपये आणि तिन्ही वाहनातील पारवान्यापेक्षा जास्त असलेली ६.४४ ब्रास रेती असा एकुण ४४,३२,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**दोन्ही कारवाईत एकुण ८.४४ ब्रास रेती आणि ४ वाहने असा एकुण ५७,४२,५००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४७(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## पोस्टे कोंढाळी हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कोंढाळी :– दिनांक २१/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, कोंढाळी शहरातील बाजार चौक परिसरात एका पडक्या दुकानात सार्वजनिक ठिकाणी काही इसम हे लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) गजानन चांगदेवराव धर्मे, वय ५० वर्ष, रा. शनिचरापेठ, व्यास कॉलेज जवळ कोंढाळी, ता. काटोल, जि. नागपूर हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. तसेच आरोपी क्र. २) विनोद सुभाष जयपुरकर, वय ४८ वर्ष, रा. लेंडीपुरा कोंढाळी, जि. नागपूर हा सदर ठिकाणी सट्टा लावण्याकरीता आला असल्याचे सांगितले. आरोपी क्र. १) याला अधिक विचारपुस केली असता आरोपी क्रं

३) फहीम शेख, रा. बाजार चौक, कोंढाळी याच्या सांगण्यावरून तो सट्टापट्टी चालवित असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम १०,४६०/— रूपये, सट्टापट्टीचे लिहण्याकरीता वापरलेले साहित्य, वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती ११,०००/—रूपये असा एकुण २१,४६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपी क्रं १) गजानन चांगदेवराव धर्मे, वय ५० वर्ष, रा. शनिचरापेठ, व्यास कॉलेज जवळ कोंढाळी, ता. काटोल, जि. नागपूर २) विनोद सुभाष जयपुरकर, वय ४८ वर्ष, रा. लेंडीपुरा कोंढाळी, जि. नागपूर ३) फहीम शेख, रा. बाजार चौक, कोंढाळी यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १८ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २१/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू तसेच वाहन, इतर साहित्य असा एकुण ७७,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे किशोर जिवन टेकाम, वय ७० वर्ष, रा. उन्द्री, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे शेखर रामु मोराडे, वय ४५ वर्ष, रा. वडोदा यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे कैलास शामलाल आत्राम, वय ४५ वर्षे, रा. वरघाट, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे १) दिपांशु विजय मेश्राम, वय २९ वर्ष, रा. नवेगाव २) आकाश विनोदकुमार जयस्वाल, वय ४० वर्षे, रा. पारशिवनी ३) शेखर समरित, वय २१ वर्षे, रा. डोगरगाव, ता. माहाडी, जि. भंडारा याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) ईंद्रकुमार रेखराज चंद्राकार, वय ३७ वर्षे, रा. बोदरी दादर मुनगामेर महासमुंद, छत्तीसगढ़ ह. मू. खालसा ढाबा चिमनाझरी २) अविनाश प्रमोद मौसकर, वय ३६ वर्षे, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर ३) रामगोपाल मायाबाबा मोरघरे, वय ४५ वर्षे, रा. खुर्मापार, ता. जि. नागपुर ४) संजय राजेश्वर डोये, वय ५५ वर्षे, रा. हिवरा हिवरी, ता. उमरेड, ता. जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** येथे आरोपी नामे अनिल प्रकाश शर्मा, वय ४२ वर्ष, रा. बोरखेडी फाटक, तालुका जिल्हा, नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे महिला आरोपी हिचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) मधुकर शेषराव वानखेडे, वय ६५ वर्ष, रा. वाघोली २) प्रल्हाद नागोजी परतेकी, वय २४ वर्ष, रा. सोनपुर, ता. सावनेर, जि. नागपूर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) कैलास माणिकरावजी राऊत, वय ४० वर्ष, रा. खुरजगाव

सावनेर २) प्रविण शालीकराव गायधने, वय ३८ वर्ष, रा. सावनेर याचे वर एक गुन्हा नोंद, तसेच ३) कमलेश रामसजीवन कैथल, वय ४६ वर्ष, रा. वाघोडा सावनेर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) श्रावन रमेशराव तेलते, वय ४३ वर्ष, रा. गळपुरा चौक, काटोल २) प्रकाशकौर चतुरसिंग भादा, वय ७२ वर्ष, रा. अर्जुन नगर, काटोल ३) महिला आरोपी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, अशा एकुण २१ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १८ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ४१ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ३३६६० मिली देशी दारू तसेच वाहन व इतर साहित्य असा एकुण ७७,८४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने